<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४/२०१८</u>

**वसंत विरुध्द सतिश**

**CNR:MHSN14-000019-2018**

## <u>नि.क्र. ३५ वरील आदेश</u>

१. प्रतिवादी नं. १ व २ तर्फे त्यांचे विरुध्द झालेला वादीचा उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून मिळणेची विनंती केलेली आहे. प्रतिवादींतर्फे असे कथन केले आहे की, सदर दाव्याचे कामी दिनांक १७/०६/२०२३ रोजी तारीख नेमली होती व त्या तारखेस प्रतिवादी कोर्टात गैरहजर होते. तसेच वादीचे सरतपासावर प्रतिवादींनी उलटतपास न घेतल्यामुळे त्यांच्याविरुध्द वादीचा उलटतपास नाही असा आदेश पारीत केलेला आहे. प्रतिवादी नं. १ व २ मुंबई येथे राहणेस असून प्रतिवादी नं. १ हे खाजगी नोकरदार व प्रतिवादी नं. २ या वयोवृध्द महिला आहेत. प्रतिवादी नं. २ या प्रतिवादी नं. १ यांच्या आई असून प्रतिवादी नं. २ यांना ब्लड प्रेशर व शुगरचा आजार असलेने त्यांना त्याचा सतत त्रास होवून त्या सतत आजारी असतात. जानेवारी २०२३ पासून प्रतिवादी नं. २ या सतत आजारी असल्याने त्यांची काळजी घेणे व औषधोपचार करणे प्रतिवादी नं. १ यांना भाग होते. तसेच प्रतिवादी नं. १ यांना नोकरीतून सुट्टी न मिळाल्याने नेमलेल्या तारखेस हजर राहणे त्यांना शक्य झाले नाही. तरी प्रतिवादींविरुध्द झालेला वादीचा उलटतपास नाहीचा आदेश रद्द होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

२. वादींतर्फे सदर अर्जावर म्हणणे दिले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. प्रतिवादी आजारी असल्याबबात कोणताही कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे. तसेच अर्ज मंजूर करणेचे झालेस कॉस्ट करणेची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादींचा अर्ज व त्यावरील वादींतर्फे दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादीचे सरतपासाचे ॲफिडेव्हीट दिनांक ०६/०२/२०२३ रोजी दिल्याचे दिसते. त्यानंतर प्रतिवादींतर्फे वादीचा उलटतपास घेण्यासाठी कोणताही प्रयत्न केला नसल्यामुळे दिनांक १७/०६/२०२३ रोजी प्रतिवादींविरुध्द वादींचा उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईसाठी दाखल

केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचे देखील हक्क हितसंबंध आहेत. त्यामुळे त्यांना वादींचा उलटतपास देण्याची संधी दिल्यास न्यायदानासाठी त्याचा उपयोग होणार आहे. त्यामुळे उभय पक्षांपैकी कोणाचेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर चालवून निकाली करणेस मदत होणार आहे. मात्र प्रतिवादींतर्फे वादींचा उलटतपास घेणेसाठी झालेल्या विलंबाची भरपाई म्हणून प्रतिवादींनी वादींना र.रु. ३००/- कॉस्ट देवून अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज नि.क्र. ३५ प्रतिवादी नं. १ व २ यांनी वादींना र.रु. ३००/- कॉस्ट म्हणून देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतो.

२. कॉस्ट रक्कम दिलेनंतर प्रतिवादी नं. १ व २ तर्फे वादींचा उलटतपास घेण्यात यावा.

VINAYA ATMARAM DESAI
Digitally signed by VINAYA ATMARAM DESAI
Date: 2023.07.20 17:52:29 +0530

शिराळा (**व्ही. ए. देसाई**)

दिनांक २०/०७/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 20/07/2023 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 20/07/2023 |
| Judgment uploaded on | : | 21/07/2023 |